महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ई. मेल :- cgmte@mahadiscom.in
फॅक्स नं. :- ०२२ -२६५८०६४२
वेबसाईट :- www.mahadiscom.in

मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष
म.रा.वि.वि.कं.मर्यादित
प्रकाशगड, ४ था मजला,
स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

क्र. साप्रवि/मु.म.व्य (तां.आ)/मपुक/३०२४२ दिनांक - ०४/१०/२०११

# परिपत्रक

विषय : कारागिर "क" (फ्युजमन-नि-मिटर वाचक) व तत्सम यांना यंत्रचालकाच्या सेवाजेष्ठतेमध्ये सामावून घेण्याबाबत.

संदर्भ : १) परिपत्रक क्र. साप्रवि/मु.म.व्य (तां.आ)/मपुक/४४५४ दि.१०/०२/२०१०

२) परिपत्रक क्र. साप्रवि/मु.म.व्य (तां.आ)/मपुक/७६२४ दि.०८/०३/२०११

**प्रस्तावना :**

संदर्भातील परिपत्रकाद्वारे प्रसुत केलेल्या सुचनेपैकी पहिली सुचना खालील प्रमाणे आहे.

" कनिष्ठ यंत्रचालक आणि कारागिर "क" (मिटर वाचक), कारागिर "क" (टेलिफोन अटेन्डट) व कारागिर "क" (विद्युत) या सर्व पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता एकच आहे आणि संचालक मंडळाने त्यांचेकडून बहुविध पदांची भूमिका पार पाडण्यास माग्यता दिलेली आहे. त्यामुळे ही सर्व पदे समकक्ष असून त्यांची मंडल निहाय एकच जेष्ठता यादी करण्यात यावी. अशी सुधारित जेष्ठता यादी करताना प्रत्येक कर्मचा-यांच्या दि. १६/०५/२००९ या दिवशीच्या स्थितीप्रमाणे सेवाजेष्ठता निश्‍चित करावी. एकच जेष्ठता यादी तयार करतांना त्यांची शैक्षणिक अर्हता आय.टी.आय.इलेक्ट्रीकल / वायरमन (वीजतंत्री / तारतंत्री) हीच असणे अनिवार्य आहे. "

या एकत्रित जेष्ठता यादीमध्ये कारागीर-क (फ्युजमन-नि-मिटर वाचक), जे कंपनीमध्ये संख्यात्मक दृष्टया अत्यंल्प आहेत, ज्यांची शैक्षणिक अर्हता उपरोल्लेखित पदांच्या समकक्ष आहे, अशा कर्मचा-यांचा समावेश करण्याबाबतची बाब काही काळ विचाराधीन होती. त्याचप्रमाणे, मनुष्यबळ पुनर्विलोकनामध्ये सहाय्यक केबल योजी, मिटर निरीक्षक श्रेणी-१, मिटर चाचणीक श्रेणी -१, मिटर निरीक्षक श्रेणी -२, मिटर चाचणीक श्रेणी -२, मिटर चाचणीक श्रेणी -३ ही पदे सुध्दा अतिरीक्त म्हणुन घोषीत झालेली असुन

सद्यस्थितीत या संवर्गातील कर्मचारी ते सेवानिवृत होईपर्यत कंपनीच्या सेवेत राहणार असुन त्यांचे वेतन त्यावेळेपर्यत इतर रिक्त पदासमोर काढावे लागणार आहे. उपरोक्त सर्व पदे वेतन गट - ३ मधील असुन त्या सर्व पदांची शैक्षणिक अर्हता समान आहे. त्यामुळे ही सर्व पदे समकक्ष असुन त्यांची एकच जेष्ठता यादी, खाली दर्शविल्याप्रमाणे, परिपत्रक क्रं. ४४५४ दि. १०/०२/२०१० व ७६२४ दि. ०८/०३/२०११ मधील मार्गदर्शक सुचनानुसार करण्याची बाब देखील काही काळ विचाराधीन होती.

वरील सर्व बाबींचा साधकबाधक विचारविनिमय होऊन संदर्भातील परिपत्रकामध्ये या परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

## :सुधारीत सूचना:

संदर्भातील परिपत्रकातील उपरोल्लेखित सुचना क्र. १ खालील प्रमाणे वाचावी.

"कारागिर "अ"/उप यंत्रचालक व सहाय्यक केबल योजी, मिटर निरीक्षक श्रेणी-१, मिटर चाचणीक श्रेणी -१ या सर्व पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता समान आहे. तसेच कारागिर "ब"/ सहाय्यक यंत्रचालक व मिटर निरीक्षक श्रेणी -२, मिटर चाचणीक श्रेणी -२, या सर्व पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता समान आहे. त्याचप्रमाणे "कनिष्ठ यंत्रचालक आणि कारागिर "क" (मिटरवाचक), कारागिर "क" (टेलिफोन अटेन्डट) , कारागिर "क" (विद्युत), कारागिर "क" (फ्युजमन-नि-मिटर वाचक) व मिटर चाचणीक श्रेणी -३ या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता समान आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांचेकडून बहुविध पदांची भूमिका पार पाडण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे ही सर्व पदे समकक्ष असून त्यांची मंडल निहाय एकच जेष्ठता यादी करण्यात यावी. अशी सुधारित जेष्ठता यादी करताना प्रत्येक कर्मचा-याच्या दि. १६/०५/२००९ या दिवशीच्या स्थितीप्रमाणे सेवाजेष्ठता निश्चित करावी. एकच जेष्ठता यादी तयार करतांना त्यांची शैक्षणिक अर्हता आयटीआय इलेक्ट्रीकल/वायरमन (वीजतंत्री/तारतंत्री) हीच असणे अनिवार्य आहे."

संदर्भातील परिपत्राकांद्वारे निर्गमित केलेल्या अन्य कोणत्याही सुचनेमध्ये बदल नाही.

सदर परिपत्रक कंपनीच्या इन्ट्रानेटवर उपलब्ध असून याची हार्ड प्रत कोणत्याही कार्यालयास पाठविली जाणार नाही.

(राहुल गोवर्धन)
कार्यकारी संचालक (मा.सं.)

F:\My documant\Office Note २०११ (Marathi).doc १५/०९/२०११